MHAU110001832023

### :- निशाणी ५ वरील आदेश :-

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ नुसार तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केला आहे.

**अर्जातील वादीचे अभिकथन थोडक्यात पुढीलप्रमाणेः**

२. वादीने मौजे आडगाव खुर्द, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद येथील जमीन जुने सर्वे नं. ५०, एकुण क्षेत्रफळ २२ एकर ३१ गुंठे पैकी १० एकर २ गुंठे (विठोबा राजाराम गाडेकर याची वाटणी) मधील अर्धे क्षेत्र २ हेक्टर १७ आर क्षेत्राबाबत मालकी घोषीत करुन मनाई हुकूम मिळणेबाबत दावा दाखल केलेला आहे.

३. वादीचे असे अभिकथन आहे की, गट नं. १४४ मधील क्षेत्रामध्ये प्रतिवादींनी खातेफोड, वाटणीपत्र, बक्षीसपत्र हस्तांतर व नामांतर वादीच्या दाव्याचा निकाल लागेपर्यंत करु नये याकरीता सदरचा अर्ज केलेला आहे.

४. वादीचे वडील मयत विठोबा राजाराम गाडेकर व त्यांचे सर्व मयत बंधू गोविंदा, रामा, सखाराम व सयाजी यांच्यात जुने सर्वे नंबर ४९ व ५० मौजे आडगांव खुर्द ता. फुलंब्री मध्ये ६० – ६५ वर्षापूर्वी सरसनिरस मानाने वाटण्या आलेल्या आहे व त्याप्रमाणे आजपर्यंत वहिवाटीबांध कायम आहेत. मयत विठोबा राजाराम गाडेकर जुने सर्वे नं. ५०, गट नं. १४४, १० एकर २ गुंठे वाटयास आली त्याची चतुसिमा भाग १/ तुकडा १ – पुर्वेस कै. चंद्रभान बाळा यांची वारसांची जमीन, पश्चिमेस – सयाजी व गोविंदा यांची जमीन, दक्षिणेस – सरकारी गायरान, उत्तरेस – कै. दगडू बंडू व किसन शंकर साठे यांची जमीन. भाग २/ तुकडा २ – क्षेत्र ९३ आर ज्याची चतुसिमा पुर्वेस कै. सयाजी गाडेकर यांची जमीन, पश्चिमेस – सरकारी नाला, दक्षिणेस – कै. रामा गाडेकर, कै. सखाराम राजाराम यांची जमीन, उत्तरेस – कै. सयाजी गाडेकर यांची जमीन येणे चतुःसिमेतील जमीनीचे ते मालक व कब्जेदार होते. वाटणीनंतर त्यांच्या क्षेत्र वहिवाटीचे बांध कायम करण्यात आले. सदर जमीन हलक्या प्रतीची असल्याने वादीचे वडील विठोबा यांनी जमीनीचे सपाटीकरण केले, विहिर खोदली व

पाईपलाईन केली व सुपीक बनविले.

५. वादी पुढे असे अभिकथन करतो की, वादीचे वडील मयत विठोबा राजाराम गाडेकर २००० मध्ये मयत झाले त्यांच्या हयातीत क्षेत्राचे वादी व त्यांचे बंधु मारोती विठोबा गाडेकर यांनी ख–या अर्थाने सन १९९८ मध्ये वाटण्या देण्यात आल्या. जुने सर्वे नं. ५०, गट नं. १४४, भाग १/ तुकडा १ क्षेत्र १ हेक्टर २३ आर, चतुसिमा पुर्वेस मारोती विठोबा गाडेकर यांची जमीन, पश्चिमेस – शंकर सयाजी गाडेकर यांची वाटणी, दक्षिणेस – सरकारी गायरान, उत्तरेस – कै. मारोती विठोबा यांची यांची जमीन. भाग २/ तुकडा २ – क्षेत्र ९३ आर पैकी ५३ आर, पोटखराब ४ आर ज्याची चतुसिमा पुर्वेस कै. शंकर सयाजी गाडेकर यांची जमीन, पश्चिमेस – लिलाबाई शंकर गाउेकर, दक्षिणेस – रायभान रामा, पार्वताबाई विष्णु, सुशिलाबाई राजाराम यांची जमीन, उत्तरेस – शंकर सयाजी यांची जमीन, चे मालक व कब्जेदार झाले आहेत.

६. वादी पुढे असे अभिकथन करतो की, वादी यांनी भाग २ मधील पश्चिमेकडून ३६ आर जमीन लिलाबाई शंकर यांना २००७ मध्ये विक्री केली व उर्वरित ५७ आर जमीन वादी कसत आहे. सन १९६८ मध्ये सर्वे न ४९ व ५० ला गट नं. १४४ देण्यात आला. एकत्रीकरण योजनेत विठोबा गाडेकर याच्या क्षेत्रास स्वतंत्र गट नंबर देऊन ७/१२ अभिलेख तयार न झाल्याने हिश्याबाबत ६५ वर्षापूवीचा वाटणीची नोंद पोटहिस्सा मोजणी करुन ७/१२ तयार करुन पोटहिस्सा मोजणीचा फाळणी १२ चा अंमल व्हावा म्हणून वादी प्रयत्नशील असताना प्रतिवादी अडथळा निर्माण करीत आहे. वादी पुढे असे अभिकथन करतो की, सरस–निसर मानाने झालेल्या वाटणीप्रमाणे पोटहिस्सा मोजणी करुन त्याप्रमाणे ७/१२ अभिलेख तयार करुन पोटहिस्सा प्रत्येकाचे क्षेत्र निश्चित करण्याकामी उपअधिक्षक भुमी अभिलेख फुलंब्री यांच्याकडून मोजणी करुन पाहणी करुन पंचनामा करुन क्षेत्र समज निश्चीतीची नोटीस प्रतिवादीस देण्यात आली आहे. वादीचे क्षेत्रास अप्रत्यक्षरित्या नाकारीत आहे म्हणून वादीस क्षेत्राची घोषणा करुन घेण्यास भाग पाडले आहे.

७. वादी पुढे असे अभिकथन करतो की, वादी हे परिच्छेद क्र. ३ मधील क्षेत्र वगळून मालक व कब्जेदार झालेले आहे व वहिवाट कायम आहे. असे असताना सरस निरस वाटण्या झालेल्या असून परंतु गट नं. १४४ मधील ७/१२ त आणेवारी प्रमाणे दाखल क्षेत्र बरोबर नाही. वादी पुढे असे अभिकथन करतो की, प्रतिवादी यांना आणेवारीप्रमाणे चुकीचे जास्तीचे क्षेत्र लागलेले आहे. परंतु प्रत्यक्षात

क्षेत्र ताब्यात, वाटणीस आलेले नसल्याने चुकीचे जास्ती क्षेत्राचा गैरफायदा घेऊन शासनाच्या योजनेचा अधिक फायदा मिळावा म्हणून गट नं.१४४ मध्ये विनाकारण खातेफोड, वाटणीपत्र, बक्षीसपत्र व हस्तांतर, नामांतर करीत आहेत. त्यामुळे, क्षेत्र व मालकी हक्कापासून वादी वंचित राहत आहे. म्हणून वादीचे क्षेत्राची मालकी घोषीत होईपर्यंत प्रतिवादी यांनी गट नं. १४४ मधील त्यांचे क्षेत्र जे सरस–निरस मानाने जागेवर झालेल्या वाटणीप्रमाणे मुळ क्षेत्राशी मेळात नसल्याने ते क्षेत्र या दाव्याचा निकाल लागेपर्यंत खातेफोड, वाटपपत्र, बक्षीसपत्र व हस्तांतर, नामांतर करु नये असाही तुर्तातुर्त मनाई हुकूम प्रतिवादी विरुध्द देण्यात यावा अशी विनंती केली.

८. प्रतिवादीचे अभिकन की, प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी, नि.१४ कडे, आपले लेखी म्हणणे दाखल करुन वादीचा अर्ज आव्हानित केला आहे. वादींचे कथन अमान्य केले आहे. नातेसंबंध मान्य केले आहे. त्यांनी जुने सर्वे नं. ४९ व ५० मधील ६०–६५ वर्षापूर्वी झालेल्या वाटण्यानुसार आजपर्यत वहिवाटी बांध कायम आहे ही बाब नाकारली आहे. प्रतिवादींनी परिच्छेद क्र. २ मधील मजकूर चतुसिमा खोटया असल्याचे कथन केले. प्रतिवादींनी पुढे कथन केले की, सदरचे वाटप हे हलक्या भारी प्रतवारीनुसार झाले आहे ही बाब नाकारली आहे. तसेच सपाटीकरण केले, विहिर खोदली व पाईपलाईन केली ही बाब नाकारली. तसेच १९९८ मध्ये वाटण्या झाल्याची बाब नाकारली. वाटणी प्रमाणे पोटहिस्सा मोजणी करुन ७/१२ अभिलेख तयार करुन उपअधिक्षक भूमि अभिलेख यांचेकडून मोजणी, पाहणी, पंचनामा केल्याची बाब नाकारली आहे. नोटीस दिल्याची बाब आणेवारी प्रमाणे दाखल क्षेत्र बरोबर नाही, जास्तीचे चूकीचे क्षेत्र लागले आहे, याबाबी नाकारल्या आहे. प्रतिवादींनी पुढे कथन केले की, तसेच दावा दाखल करण्यास कारण घडले नसल्याचे कथन केले आहे.

९. प्रतिवादींनी गट नं. १४४ मध्ये प्रतिवादी क्र. १ रायभान याचे नावे २ हे ९९ आर, प्रतिवादी क्र. २ पार्वताबाई हीचे नाव १ हेक्टर २० आर, प्रतिवादी क्र. ३ रघूनाथ याचे नावे ९८ आर, प्रतिवादी क्र. ४ भागूबा याचे नावे १ हे ७५ आर, प्रतिवादी क्र. ५ सुशीलाबाई राजाराम हीचे नावे १ हे २० आर, शेत जमीन आहे. सदरील जमीन ही ७/१२ मध्ये नोंद असून वडीलोपार्जित जमीन आहे व वहितीत आहे.

१०. प्रतिवादींनी पुढे कथन केले की, मयत गोविंदा राजाराम, सयाजी राजाराम, रामा राजाराम, सखाराम राजाराम, विठोबा राजाराम यांचे मध्ये सदरील

जमीनीची ५० वर्षापूर्वी वाटणी झाली आहे. त्यानुसार वादी व प्रतिवादी यांचे ताब्यात व मालकी हक्कात व वहीतीत जमीनी आहेत. भगवान विठोबा गाडेकर हे भूमी अभिलेख कार्यालय मौजे फुलंब्री येथे नोकरीस होते. त्यांनी प्रतिवादींची जमीन हडप करण्यासाठी सदरील भूमीअभिलेख कार्यालयात जमीन मोजणीचा अर्ज देऊन खोटी मोजणी दाखवली आहे. खोटा पंचनामा, नकाशा, खोटा गाव नं. १२ दाखविला आहे. प्रतिवादींनी पुढे कथन केले की, प्रतिवादी यांना कसलीही नोटीस न देता त्यांची कसलीही संमती न घेता सदरील गटातील क्षेत्र व प्रत्येकाचे ताब्यातील क्षेत्र वादीचे इच्छेने मोजणी अधिकारी यांना हाताशी धरुन दाखविले आहे. त्यात प्रतिवादीचे नावावरील क्षेत्र कमी करुन वादीचे नावे जास्तीचे क्षेत्र दाखविले आहे. प्रतिवादींनी पुढे कथन केले की, बनावट मोजणी आधारे वादी हे प्रतिवादीचे क्षेत्र कमी करु पाहात आहे. ताब्यातील जमीनीत ५० वर्षापूर्वीपासूनचे बांध आहेत. ७/१२ नोंदीप्रमाणे वहिती करीत आहे. प्रतिवादींनी मा. जिल्हा अधीक्षक भूमिअभिलेख कार्यालय औरंगाबाद येथे अपील वादी व इतर यांचे विरुध्द तालुका भुमिअभिलेख कार्यालय फुलंब्री यांनी गट नं.१४४ ची मोजणी, नकाशा व भागधारकाचे क्षेत्र, समज नोटीस या विरुध्द अपील दि.६/५/२०२१ दाखल केले आहे ते अंतिम निर्णयासाठी आहे. कायदयाने बंधनकारक असताना वादीने प्रतिवादींची वंशावळ दिलेली नाही. वादीने दाव्यात गट नं. १४४ मधील ३६ आर शेतजमीन लिलाबाई शंकर यांना २००७ मध्ये विक्री केल्याचे दाखवले आहे. परंतु, लिलाबाई शंकर यांना आवश्यक ते पक्षकार केलेले नाही. प्रतिवादींनी पुढे कथन केले की, मूळ पाच भाऊ गोविंदा, सयाजी, रामा सखाराम, विठोबा यांचे मूली तसेच त्यांचे बहिणी यांना दाव्यात पार्टी केले नाही. त्यामुळे दावा नामंजूर करण्यास पात्र आहे. प्रतिवादींनी पुढे कथन केले की, केवळ कथीत मोजणी आधारे मालकी हक्क घोषीत करण्यासाठी केलेला दावा बेकायदेशीर असल्याचे म्हटले आहे. तरी वादीचा तात्पूरत्या मनाई हुकूमाचा अर्ज खर्चासह नामंजूर करावा.

११. दोन्ही पक्षांचा परस्परविरुध्द अभिकथनावरुन अर्ज निकाली करण्यास माझ्यापुढे खालील मुद्दे उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष मी खालील कारणमिमांसेसह नोंदविले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी त्याच्या लाभात प्रथमदर्शनी केस आहे असे शाबीत करतो काय ? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| २. | न्यायाचा तराजू वादीच्या बाजूने आहे असे तो शाबीत करतो काय ? | नाही. |
| ३. | तुर्तातूर्त मनाई आदेश न मंजुर केल्यास त्याचे पैश्याच्या स्वरुपात भरुन न येणारे नुकसान होईल असे तो शाबीत करतो काय ? | नाही. |
| ४. | काय आदेश ? | निशाणी ५ अर्ज नामंजूर. |

## कारणमिमांसा

१२. वादीतर्फे विधीज्ञ श्री. एस.एस.गायकवाड यांचा तर प्रतिवादींतर्फे विधिज्ञ श्री. व्ही. डी. डांगे यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. दोन्ही पक्षाने अभिलेखावर सादर केलेले कागदपत्रांचे आणि प्रतिज्ञापत्रांचे काळजीपुर्वक अवलोकन केले.

### मुद्दा क्र. १ ते ३ करीता

१३. दाव्याचे अवलोकन केले असता वादीने सदरचा दावा हा मालकी घोषीत करण्याकरिता आणि दाव्याचा निकाल लागेपर्यंत मनाईहुकूमाकरीता केला आहे. वादीने अर्जामध्ये त्याचे वडिल विठोबा राजाराम गाडेकर हे सन २००० मध्ये मयत झाले व वादी व त्याचा बंधू यांच्यामध्ये १९९८ मध्ये वादीच्या वडिलांच्या हिश्याला आलेल्या जमीनीचे वाटप केले. तसेच वादी यांने त्यातील ३६ आर क्षेत्र लिलाबाई शंकर हिला २००७ मध्ये विक्री केलेले आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे सन १९६८ मध्ये सर्वे नं. ४९ व ५० चे धारक वेगवेगळे असतांना व त्याची वाटणी क्षेत्र वेगवेगळे असतांना एकत्रीत योजनेत दोनही सर्वे नंबरला एकच गट नं.१४४ देण्यात आलेला आहे. सर्वे नंबर ५० मध्ये १० एकर २ गुंठे जमीन प्रत्यक्ष वाटून त्याचे वडील मयत विठोबा यांचे मालकी व ताबा देण्यात आले आहे. एकत्रीत योजनेमध्ये मयत विठोबा याच्या वाटणीस आलेल्या क्षेत्राचा स्वतंत्र ७/१२ अभिलेख तयार करण्यात आलेला नाही. त्यामुळे वादी हा झालेल्या वाटणीची नोंद पोटहिस्सा मोजणी करुन त्याप्रमाणे ७/१२ अभिलेख तयार करुन पोटहिस्सा मोजणीचा फाळणी १२ चा अंमल व्हावा म्हणून प्रयत्नशील असतांना प्रतिवादी त्यास अडथळा करीत आहे. त्याकरीता वादीने उपअधिक्षक भुमि अभिलेख फुलंब्री यांच्याकडे अर्ज करुन त्या मोजणीची प्रत्यक्ष पाहणी करुन, पंचनामा करुन त्या

क्षेत्र समज निश्चितीची नोटीस प्रतिवादीस देण्यात आली आहे. परंतु प्रतिवादी वादीच्या क्षेत्राची मालकी नाकारत असल्याने त्याने दावा दाखल केला.वादी, प्रतिवादी यांना आणेवारीप्रमाणे चुकीचे जास्तीचे क्षेत्र लागलेले आहे परंतु एवढे क्षेत्र त्याच्या वाटणीस ताब्यात आले नसल्याने चुकीचे जास्त लागलेल्या क्षेत्राचा गैरफायदा घेऊन प्रतिवादी हे शासनाच्या योजनेचा फायदा मिळावा म्हणून गट क्र. १४४ मध्ये विनाकारण खातेफोड, बक्षीसपत्र नामांतरण करीत आहे. वादीने सदर दाव्यासोबत सर्वे क्र. ४९ व ५० चा ७/१२ उतारा, गाव नकाशा, गट नं. १४४ मौजे आडगाव खु चा सन २००९, २०११, सन २०२२, गट नं १३९ पोट हिस्सा मोजणी नकाशाची दि.१६/११/२०२१ ची सत्यप्रत, पोट हिस्सा मोजणी तपासणीचा पंचनामा दि. १६/११/२०२१ ची सत्यप्रत, उपअधिक्षक भुमि अभिलेख फुलंब्री यांचे क्षेत्र समज नोटीस व फाळणी बारा लागून करणे बाबत दि.१३/१०/२०२१ चे पत्र ची सत्यप्रत, तहसिलदार फुलंब्री यांचे तलाठी सजा पिरबावडा यांना दिलेले निर्देश पत्र दि. २८/१२/२०२१ ची छायांकीतप्रत, तहसिलदार फुलंब्री यांचे तलाठी सजा पिरबावडा यांना दिलेले निर्देश पत्र दि. २६/४/२०२२ ची छायांकीतप्रत सादर केले आहे.

१४. प्रतिवादीने असे म्हटले आहे की, वादमिळकतीला ५० वर्षापासून बांध आहेत. प्रतिवादी हे गट नं. १४४ मध्ये त्यांच्या नावे असलेली जमीन तेव्हापासून वहिती करीत असून त्यांच्या ताब्यात आहे. प्रतिवादी यांना कसलीही नोटीस न देता त्यांची कसलीही संमती न घेता सदरील गटातील क्षेत्र व प्रत्येकाचे ताब्यातील क्षेत्र वादीचे इच्छेने मोजणी अधिकारी यांना हाताशी धरुन दाखविले आहे. त्यात प्रतिवादीचे नावावरील क्षेत्र कमी करुन वादीचे नावे जास्तीचे क्षेत्र दाखविले आहे. वादीने दाखल केलेल्या कागदपत्रांच्या विरुधद जिल्हा अधिक्षक भुमि अभिलेख येथे अपील दाखल केले आहे. वादीने दाव्यामध्ये पुर्वीचे मालक व नंतरचे मालक यांची वंशावळी दर्शवलेली नाही. वादीच्या भावाने स्वतःच २००७ मध्ये कोणतीही कारवाई न करता ३६ आर क्षेत्र लिलाबाई शंकर यांना विक्री केले. वादीने लिलाबाई तसेच इतर वारसांना दाव्यात पक्षकार केलेले नाही. सदर वादमिळकत ही प्रतिवादीच्या ताब्यात व कब्जात असल्याने वादीला तात्पूरता मनाई हुकूम मागण्याचा अधिकार नाही.

१५. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ मध्ये तुर्तातुर्त मनाईबाबत खालीलप्रमाणे तरतुद केली आहे.

१. ज्या प्रकरणामध्ये तात्पुरते मनाई हुकूम देता येतील ती प्रकरणेः–

[(१)] कोणत्याही दाव्यात शपथपत्रावरुन किंवा अन्यथा–

(अ) एखाद्या दाव्यातील काणत्याही वादग्रस्त मालमत्तेचा दाव्यातील कोणत्याही पक्षकाराकडुन अपव्यय केला जाण्याचा, तिचे नुकसान केले जाण्याचा किंवा ती अन्यक्रमित केली जाण्याचा अथवा हुकूमनाम्याची अंमलबावणी करतांना तिची गैरपणे विक्री केली जाण्याचा धोका असल्याने अथवा

(ब) प्रतिवादी त्याच्या धनकोची [फसवणुक करण्याच्या] दृष्टीने त्याची मालमत्ता हलवण्याची किंवा तिची विल्हेवाट लावण्याचा त्याचा उद्देश असल्याचे,

[(क) दाव्यातील कोणत्याही वादग्रस्त मालमत्तेच्या संबंधत प्रतिवादी, वादीला त्याचा कब्जा काढुन घेण्याची धमकी देत आहे अथवा त्याविषयी अन्यथा वादीला क्षती पोहवत आहे]

असे सिध्द करण्यात आल्यास न्यायालयाला, दावा निकालात निघेपर्यंत किंवा पुढील आदेश दिला जाईपर्यंत, अशा विरोध कृतीला करण्यासाठी आदेशाद्वारे तात्पुरता मनाई हुकूम देता येईल किंवा अशा मामत्तेचा अपव्यय, नुकसान, अन्यक्रमण, विक्री ती हलवणे अथवा तिची विल्हेवाट लावणे [किंवा दाव्यांतील कोणत्याही वादग्रस्त मालमत्तेच्या संबंधत वादी कडुन कब्जा काढुन घेणे किंवा अन्यथा वादीला क्षती पोहवणे] या गोष्टी स्थगित करण्याच्या आणि त्यांना प्रतिबंध करण्याच्या प्रयोजनासाठी, न्यायालयाला योग्य वाटेत असा अन्य आदेश देता येईल.

१६. वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये ६० –६५ वर्षापूर्वी म्हणजे जमीन एकत्रीकरण योजना राबवण्याच्यापूर्वी वाटप झाल्या बाबत वादी व प्रतिवादी या दोघांचे म्हणणे आहे. तसेच वादीचे वडील हे सन २००० मध्ये मयत झाले व वादी व त्याच्या भावांमध्ये सन १९९८ मध्ये वाटप झाल्याचे प्रथमदर्शनी दिसते. वादी याने २००७ मध्ये गट नं. १४४ मधील ३६ आर जमीन लिलाबाई शंकर यांना व्रिक्री केल्याचे नमुद केले आहे. त्यामुळे सदरचा दावा दाखल करेपर्यंत वादीने मागणी केल्याबाबत आक्षेप घेतल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. आजून असे की, जमीन एकत्रीकरणाबाबत झालेली चूक ही दुरुस्त करण्याचा अधिकार राज्य शासन व त्यांनी नेमलेल्या अधिका–यास असतो.

१७. त्याकरीता मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी **नामदेव भाऊ चव्हाण वि. शांताबाई अंबिका चव्हाण २०११ (४) महाराष्ट्र लॉ जरनल २०७,** मध्ये असे मत व्यक्त केले आहे की, कलम ३६ ए महाराष्ट्र तुकडे बंदी कायदा, १९४७

प्रमाणे या कायदयाअंतर्गत राज्य शासन किंवा या कायदयाअंतर्गत नेमणूक केलेल्या अधिका–यास फक्त या कायदयातील तरतुदींबाबत निर्णय घेऊ शकतो. दिवाणी न्यायालयास या कायदयाअंतर्गत निर्णय घेण्याचे अधिकार नाही.

१८. कलम ३६ अ महाराष्ट्र तुकडे बंदी कायदा, १९४७ प्रमाणे या कायदयाअंतर्गत राज्य शासन किंवा या कायदयाअंतर्गत नेमणूक केलेल्या अधिका–यास फक्त या कायदयातील तरतुदींबाबत निर्णय घेऊ शकतो. दिवाणी न्यायालयास या कायदयाअंतर्गत निर्णय घेण्याचे अधिकार नाही. प्रतिवादीने कथन केल्याप्रमाणे दुरुस्ती करण्याबाबतचा वाद हा वरिष्ठ अधिका–यांकडे दाखल आहे. वादीने सदरचा दावा हा मालक घोषीत करण्याकरीता दाखल केलेला आहे. सबब, वादीस प्रथमदर्शनी केस नाही या निष्कर्षापर्यंत मी आलो आहे. त्याचप्रमाणे न्यायाचा तराजु देखील वादीच्या बाजुने झुकत नसुन तो प्रतिवादींच्याच बाजुला झुकताना दिसतो. करीता मी मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविले आहेत.

**मुद्दा क्र. ४ करीता**

१९. माझ्या वरील विवेचनावरुन वादी तुर्तातुर्त मनाई आदेश मिळविण्यास आवश्यक असलेली महत्वाची तीन तत्वे शाबीत करु शकला नाही. सबब, वादीचा अर्ज मंजुर होण्यास पात्र नाही. करीता मी मुद्दा क्र. ४ चे उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. अर्ज नि.५ नामंजूर करण्यात येत आहे.

२. या अर्जाचा खर्च दोन्ही पक्षांनी ज्याचा त्याने सोसणेचा आहे.

DHANANJAY SHIVAJI DEORE
Digitally signed by DHANANJAY SHIVAJI DEORE
Date: 2023.08.14 17:27:57 +0530

दिनांक :– १२/०८/२०२३

(धनंजय एस. देवरे),
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, फुलंब्री.

CERTIFICATE

I am affirm that the contents of this PDF file order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer : S. D. Chavan
Court : Jt. C.J.J.D., Phulambri Dist. Aurangabad.
Date of the order : 12/08/2023.
Order digital signed by the
presiding officer on : 14/08/2023.
Order uploaded on : 14/08/2023.

..........